**सन २०२६-२७ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेच्या अंमलबजावणीस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## कृषि विभाग

**शासन निर्णय क्रमांक : मुशाशो ०५२६/प्र.क्र.६१(ई ऑफीस क्र. १६५७७४९)/१४-अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०२६.

**संदर्भ :**

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/मृदसं/वै.शेततळे/FCFS/१६१-र/२०२६, दिनांक २८.०४.२०२६.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२९/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
४. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: मुशाशो ०५२६/प्र.क्र.६१/१४-अे, दिनांक २२.०५.२०२६.
५. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. कृआ प्रकरण क्र./फलो-४/२०२६-२७/मुशासिं/R-२४४/२०२६, दिनांक २५.०५.२०२६.
६. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. मुशाशो-०५२६/प्र.क्र.६१(१६५७७४९)/१४-अे, दिनांक १६.०७.२०२६.
७. संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/मृदसं/मृद-३/ शेततळे/निधी मागणी/र-५३५/२०२६, दिनांक १४.०८.२०२६.
८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/मृदसं/मृद-३/शेततळे/निधी मागणी/र-६०५/२०२६, दिनांक ०३.०९.२०२६.

**प्रस्तावना :**

कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र.२ येथे नमूद दिनांक २८.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार, मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना - सुक्ष्म सिंचन व वैयक्तिक शेततळे साठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध असलेली ₹२०.०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद संदर्भ क्र. ४ येथे नमूद दिनांक २२.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूक्ष्म सिंचन या

घटकाकरिता वापरण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. आता, कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र. ८ येथे नमूद दिनांक ०३.०९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सन २०२५-२६ मध्ये निवड झालेल्या तथापि अद्यापही अनुदान वितरीत न झालेल्या शेततळ्यांचे प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी ₹ ६.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार, संदर्भ क्र. ४ येथे नमूद दिनांक २२.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

सन २०२६-२७ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना राबविण्यासाठी ₹ २०.०० कोटी (रुपये वीस कोटी फक्त) निधीच्या कार्यक्रमास यापुर्वी देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश अधिक्रमीत करून सुधारीत मान्यता देण्यात येत असून त्याचा घटकनिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | बाब | मंजूर कार्यक्रम |
|---|---|---|
| १. | सुक्ष्म सिंचन<br>[केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत - प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) घटकांतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान]<br>अ. ठिबक सिंचन<br>आ. तुषार सिंचन | **₹ १४.००** |
| २. | वैयक्तिक शेततळे | **₹ ६.००** |
| | **एकूण...** | **₹ २०.००** |

२. या योजनेंतर्गत वितरित करण्यात येणारा निधी पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदींतून खर्च करण्यात यावा.

मागणी क्र. डी-३

२४०१, पीक संवर्धन,

११३, कृषि अभियांत्रिकी

(००)(२२) मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना (सर्वसाधारण) (कार्यक्रम),
(२४०१बी०७२), ३३ - अर्थसहाय्य

३. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महा-डीबीटी प्रणालीद्वारे करावी आणि लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदानाची रक्कम सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करावी.

४. या योजनेंतर्गत वितरीत निधी कोषागारातून आहरित करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेची अंमलबजावणी करताना प्रधान मंत्री कृषि सिंचन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

६. या योजनेंतर्गत वितरीत निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखाकार कार्यालयास पाठवून त्याची प्रत राज्य शासनास सादर करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१७१५४६५८०३४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.09.17 15:55:32 +05'30'

**(ग.सं. कचरे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
८. सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य.
१०. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव तथा विकास आयुक्त (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव (पशुसंवर्धन) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, एपीजे हाऊस, मुंबई.
१७. राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१८. संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२०. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
२१. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
२२. वित्त विभाग (व्यय- १/अर्थसंकल्प १३), मंत्रालय, मुंबई.
२३. नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
२४. सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२६. निवडनस्ती (१४-अे कार्यासन) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.